[illegible]

सेवानिवृत्ति.

मंत्रालयाबाहेरील दूर[illegible] व राज्यातील इतर कार्यालयातील तृतीयश्रे[illegible] [illegible]-यांबाबत पुनर्विलोकन समित्यांची पुनर्रचना...

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक, क्रमांक-एसआरसी-१०८६/३१/[२]/पंधरा-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ४ मार्च, १९८६.

पहा:- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक-एसआरसी-१०७६/पंधरा, दिनांक २९. १. १९७६.

परिपत्रक

महाराष्ट्र नागरी सेवा [निवृत्तिवेतन] नियम, १९८२ च्या नियम-१० [४] नुसार सार्वजनिक हितास्तव अकार्यक्षम/संशयास्पद सचोटीच्या कर्मचा-यांना शासनाच्या सेवेतून मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्याचे अधिकार समुचित प्राधिका-यांना [ॲप्रोप्रिएट ऑथॉरिटीना म्हणजेच नियुक्ति प्राधिका-यांना] आहेत. तसेच नियम-६५ नुसार सार्वजनिक हितास्तव अकार्यक्षम/संशयास्पद सचोटीच्या कर्मचा-यांना मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्याचे अधिकार नियुक्ति प्राधिका-यांना आहेत. वर्ग-३ च्या संवर्गातील कांही पदांसाठी विभाग प्रमुख समुचित प्राधिकारी [ॲप्रोप्रिएट ऑथॉरिटी म्हणजेच नियुक्ति प्राधिकारी] असतात, तर काही वर्ग-३ च्या संवर्गातील पदांबाबत कार्यालय-प्रमुख समुचित प्राधिकारी [ॲप्रोप्रिएट ऑथॉरिटी म्हणजेच नियुक्ति प्राधिकारी] असतात. थोडक्यात विभाग प्रमुख अथवा कार्यालय प्रमुख ज्या संवर्गातील कर्मचा-यांच्याबाबत नियुक्ति प्राधिकारी असतात, अशा कर्मचा-यांबाबत वयाच्या ५५ वर्षांपुढे अथवा ३० वर्षांच्या अर्हकारी सेवेपुढे सेवेत राहाण्याची त्यांची पात्रापात्रता महाराष्ट्र नागरी सेवा [निवृत्तिवेतन] नियम, १९८२ च्या नियम, १०, [४] व ६५ नुसार संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखांनी ठरवावयाची आहे. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरसी-१०७६/१५, दिनांक २९. १. १९७६ नुसार - त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांच्या अधीन राहून-मंत्रालयाबाहेरील दूरक्षेत्रातील व राज्यातील इतर कार्यालयातील तृतीय श्रेणीच्या कर्मचा-यांबाबत वयाच्या ५५ वर्षांपुढे त्यांची सेवेत राहाण्याची पात्रता अजमावण्यासाठी पुनर्रचित विशेष पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

२. कार्यक्षम व सुयोग्य अशा ज्येष्ठ कर्मचा-यांना सार्वजनिक हितार्थ वयाच्या ५८ वर्षापर्यन्त सेवेत ठेवावे आणि अकार्यक्षम व संशयास्पद सचोटीच्या कर्मचा-यांना शक्यतो लवकर शासन सेवेतून मुक्त करावे या दृष्टीने कर्मचा-यांची वयाच्या ५५ व्या वर्षी किंवा ३० वर्षांची अर्हकारी सेवा पूर्ण होतेवेळी, यापैकी जे अगोदर घडेल तेव्हा, पात्रापात्रता अजमाविण्यासाठी कसोशीने पुनर्विलोकन करावे हे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार प्रस्तुत विषयावरील संबंधित आदेशांचे अधिक्रमण करुन तृतीय श्रेणीच्या कर्मचा-यांची, वयाच्या ५५ व्या वर्षापुढे अथवा ३० वर्षाच्या अर्हकारी सेवेपुढे, ह्यापैकी जे अगोदर घडेल तेव्हा, सेवेत राहाण्याची पात्रापात्रता अजमावण्याच्या दृष्टीने पुनर्विलोकन करुन समुचित प्राधिका-यांना [ॲप्रोप्रिएट ऑथॉरिटीना म्हणजे नियुक्ति प्राधिका-यांना म्हणजेच विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना] सल्ला देण्यासाठी विशेष पुनर्विलोकन समित्यांची खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे :-

[अ] [१] विभाग प्रमुखांना पुनर्विलोकन विषयक सल्ला देण्यासाठी समित्या :-

१] विभागांतील विभाग प्रमुखांव्यतिरिक्त वर्ग-१ चा ज्येष्ठ अधिकारी.	अध्यक्ष
२] विभागातील अन्य वर्ग-१ चा ज्येष्ठ अधिकारी.	सदस्य
३] मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील जिल्ह्यातील इतर विभागातील वर्ग-१ चा ज्येष्ठ अधिकारी. असा अधिकारी उपलब्ध नसल्यास जिल्ह्यातील इतर कोणत्याही विभागातील प्रशासकीय विभागाच्या सचिवाने नामनिर्देश केलेला अधिकारी.	सदस्य
४] विभागातील प्रशासन विषय हाताळणारा वर्ग-२ चा ज्येष्ठ अधिकारी.	सचिव

[२] अशा समित्या सर्व [illegible] ज्यांनी ते ज्या वर्ग-२ [illegible] संवर्गातील पदांकरिता नियुक्ति प्राधिकारी आहेत, [illegible]रिता उपरोल्लेखित र[illegible] [illegible] स्थापन कराव्यात व तसेच केल्याचे संबंधित विभागाच्या सचिवांना एक महिन्याच्या आंत कळवावे.

[३] तृतीय श्रेणीच्या ज्या पदांच्या बाबतीत महाराष्ट्र नागरी सेवा [निवृत्तीवेतन] नियम, १९८२ च्या नियम १० [४] अन्वये विभाग प्रमुख "समुचित प्राधिकारी" [नियुक्ति प्राधिकारी] असतील अशा पदांच्या धारकांची वयाच्या ५५ व्या वर्षा-पलिकडे तसेच नियम ६५ नुसार ज्यांची अर्हकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाली आहेत अशांच्या बाबत सेवेत राहाण्याची पात्रापात्रता ही समिती अजमावील व आपल्या शिफारशी समुचित प्राधिका-यांना [नियुक्ति प्राधिका-यांना] म्हणजेच विभाग प्रमुखांना सादर करील.

[ब] [१] कार्यालय प्रमुखांना पुनर्विलोकन विषयक सल्ला देण्यासाठी समित्या:--

[१] कार्यालय प्रमुखांव्यतिरिक्त वर्ग-१ किंवा वर्ग-२ मधील ज्येष्ठ अधिकारी.	अध्यक्ष
[२] मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील इतर कार्यालयातील वर्ग-१ किंवा वर्ग-२ चा ज्येष्ठ अधिकारी. असा अधिकारी उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही जिल्हा कार्यालयातील वर्ग-१ चा किंवा वर्ग-२ चा ज्येष्ठ अधिकारी.	सदस्य
[३] वर्ग-१ चा प्रशासनाशी संबंधित ज्येष्ठ अधिकारी उपलब्ध असल्यास किंवा प्रशासनाशी संबंधित असलेला वर्ग-२ चा अधिकारी.	सचिव

[२] अशा समित्या सर्व कार्यालय प्रमुखांनी, वर्ग-३ च्या संवर्गातील ज्या पदांकरिता ते नियुक्ति प्राधिकारी आहेत अशांकरिता, उपरोल्लेखित रचनेनुसार स्थापन कराव्यात व तसे केल्याचे विभाग प्रमुखांना एक महिन्याच्या आंत कळवावे.

[३] वरील सूचनांनुसार कार्यालय प्रमुखांनी विशेष पुनर्विलोकन समित्यांच्या स्थापने बाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा विभाग प्रमुखांनी दोन महिन्यांच्या आत घ्यावा.

...४

[४] ... ांच्या बाबतीत महाराष्ट्र नागरी सेवा [निवृत्तिवेतन] नियम, ... नियम १० [४] अन्वये ... "समुचित प्राधिकारी" [नियुक्ती प्राधिकारी] असतील अशा पदांच्या धारकांची वयाच्या ५५ व्या वर्षानंतर तसेच नियम-६५ नुसार ज्यांची ३० वर्षांची अर्हकारी सेवा पूर्ण झाली आहे अशांबाबत सेवेत राहण्याची पात्रापात्रता ही समिति अजमावील व आपल्या शिफारशी "समुचित प्राधिका-यांना" [नियुक्ति प्राधिका-यांना] म्हणजेच कार्यालय प्रमुखांना सादर करील.

३. ... मध्ये करावयाच्या पुनर्विलोकनाच्या कामाचा व प्रत्यक्षात झालेल्या कामाचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात यावा.

[१] स्वत: विभाग प्रमुखांच्या स्तरावर प्रत्येक कॅलेंडर वर्षात पुनर्विलोकनीय असलेली प्रकरणे व प्रत्यक्षात पुनर्विलोकन केलेली प्रकरणे तसेच आपल्या अधिकाराखालील सर्व कार्यालय प्रमुखांच्या स्तरावर प्रत्येक कॅलेंडर वर्षात पुनर्विलोकनीय असलेली प्रकरणे व प्रत्यक्षात पुनर्विलोकन केलेली प्रकरणे यांचा आढावा पुढील वर्षाच्या जानेवारी महिन्यात घ्यावा व त्याबद्दलचा अहवाल विभाग प्रमुखांनी या परिपत्रकाला जोडलेल्या विवरणपत्रात संबंधित मंत्रालयीन सचिवांना पाठवावा.

[२] मंत्रालयीन सचिवानी विभाग प्रमुखांकडून आलेल्या अहवालांचे परीक्षण करावे व सर्व विभाग प्रमुखांचा एकच एकत्रित अहवाल विहित विवरण पत्रात सा. प्र. वि. कडे आपल्या अभिप्रायासह पाठवावा.

[३] असा पहिला वार्षिक अहवाल, १९८६ च्या कॅलेंडर वर्षासाठी असेल व तो जानेवारी, १९८७ मध्ये विभाग प्रमुखांकडून अपेक्षित आहे. विभाग प्रमुखांनी आपआपले वार्षिक अहवाल मंत्रालयीन विभागांच्या सचिवांकडे ३१ जानेवारी, १९८७ पर्यन्त पाठवावेत व सचिवांनी हे अहवाल आपल्या अभिप्रायांसह सामान्य प्रशासन विभागाकडे दि. २८ फेब्रुवारी, १९८७ पर्यन्त पाठवावेत. या पुढील ... वार्षिक अहवाल पाठविताना वरील प्रमाणेच काल मर्यादेचे पालन करावे.

४. मंत्रालयीन विभागांना विनंती आहे की, त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांनी विशेष पुनर्विलोकन समित्यांची परिच्छेद-१ मध्ये वर दर्शविल्याप्रमाणे पुनर्रचना केली आहे याची खात्री करुन घ्यावी व तसेच महिन्याच्या आत सामान्य प्रशासन विभागाला कळवावे. तसेच पुनर्रचित विशेष पुनर्विलोकन समित्यांच्या बैठका वेळच्यावेळी होतात किंवा नाही आणि त्यांच्यावर सोपविलेले पुनर्विलोकनाचे काम

शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे केले जाते किंवा नाही याबाबत दक्षता घ्यावी.

५. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०६९/डी, दिनांक ३०.९.१९६९ नुसार-तत्पश्चात केलेल्या सुधारणांच्या अधीन-देण्यात आलेल्या पुनर्विलोकनाच्या कार्यपध्दती विषयक सूचनांनुसार पुनर्विलोकन समित्यांनी कर्मचाऱ्यांची वयाच्या ५५ व्या वर्षापुढे तसेच ३० वर्षाच्या अर्हकारी सेवेपुढे सेवेत राहाण्याची पात्रापात्रता अजमावून त्यानुसार समुचित प्राधिकाऱ्यांकडे आपली शिफारस कळवावी.

६. ह्या विषयासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना/आदेश संकलित करून अलगरित्या तपशिलवार सूचना मार्गदर्शनासाठी निर्गमित करण्यांत येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

मुकुन्द स. मोकाशी

[मुकुन्द स. मोकाशी]
उप सचिव.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
शासनाचे सर्व सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख [न्यायालयीन विभागाव्यतिरिक्त]
निवड फाईल.